# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 18 June 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक: १८ जून २०२४ दुपारी १.०० वा.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज शेतकरी सन्मान निधीअंतर्गत २० हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा १७ वा हप्ता जारी करणार आहेत. नऊ कोटी २६ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ही रक्कम थेट जमा होईल. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ११ कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना, तीन लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा लाभ झाला आहे. उत्तर प्रदेशातल्या वाराणसी इथं होणाऱ्या याच कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते, स्वयं सहाय्यता गटातल्या ३० हजारांहून अधिक महिलांना कृषी सखी प्रमाणपत्राचं वाटप करण्यात येणार आहे.

देशभरात निवडक ५० कृषी विकास केंद्रांवरही विशेष कार्यक्रमांचं आयोजन यावेळी केलं जाणार आहे. हिंगोली जिल्ह्यात तोंडापूर इथल्या कृषी विज्ञान केंद्रात, केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.

****

येत्या २१ जून रोजी साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम यंदा श्रीनगर इथं होणार आहे. केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. 'स्वत:साठी आणि समाजासाठी योग', ही यावर्षीच्या योग दिनाची संकल्पना आहे.

दरम्यान, योग दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उष्ट्रासनाची माहिती देणारी एक चित्रफित आज सामाजिक माध्यमांवर सामायिक केली आहे. या आसनामुळे पाठीचे आणि मानेचे स्नायू मजबूत होतात, त्याचबरोबर रक्ताभिसरण सुधारण्यासोबतच दृष्टीही सुधारते. या आसनाचा सराव करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे.

****

वीजजोडणी तसंच वीजबिलासंदर्भात ग्राहकांनी आपली माहिती अर्थात केवायसी अद्ययावत करावी, अशा प्रकारची फसवणूक फोनद्वारे होत असल्याच्या तक्रारी आल्यानंतर, दूरसंचार विभागानं, नागरिकांच्या सुरक्षेसाठी कारवाई सुरु केली आहे. सायबर गुन्हे आणि आर्थिक फसवणुकीमध्ये गैरवापर झाल्याच्या तक्रारी असलेल्या, देशभरातल्या ३९२ मोबाइल संचांच्या सेवा बंद करण्याचे निर्देश सर्व दूरसंचार सेवा देणाऱ्या कंपन्यांना दिले आहेत. या संचांशी जोडलेल्या ३१ हजार ७४० मोबाइल कनेक्शनची पुन्हा पडताळणी करण्याचे निर्देशही मंत्रालयानं दिले आहेत.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दाखवण्यात आलेल्या एक्झिट पोल दरम्यान शेअर बाजारात हेराफेरी झाली होती का, याची चौकशी करावी या मागणीसाठी, तृणमूल काँग्रेसचे तीन खासदार, भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ – सेबीला भेट देण्यासाठी आज मुंबईत दाखल झाले आहेत. त्यांच्या या मागणीला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने पाठींबा दिला असल्याची माहिती, पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी ट्विट संदेशात दिली. या खासदारांनी शरद पवार यांच्या मुंबईतल्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्याशी चर्चा केली. यावेळी खासदार कल्याण बॅनर्जी, सागरिका घोष आणि साकेत गोकले, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत, खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होते.

****

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी सरकारसोबत चर्चेसाठी आपलं कोणतंही शिष्टमंडळ जाणार नसल्याचं सांगितलं आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का लावू नये या मागणीसाठी, जालना जिल्ह्यात वडीगोद्री इथं हाके यांच्यासह नवनाथ वाघमारे यांचं उपोषण सुरु आहे. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत सरकारने यासंदर्भात निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

****

१८ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज माहितीपट, लघु आणि ॲनिमेशन चित्रपट दाखवण्यात येणार आहेत. यामध्ये स्टोरी ऑफ अ पेंटिंग, एलियन, अ डॉक्युमेंटरी अबाउट लीगल, टेल्स ऑफ ऑब्लिव्हियन या चित्रपटांचा समावेश आहे.

****

प्रधानमंत्री सुरक्षा मातृत्व अभियान, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना आणि मुलांसाठीचा पोषण अभियान जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना यासारख्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे राज्याच्या माता मृत्यू दरात घट झाली आहे. राज्यातल्या माता मृत्यूंची संख्या गेल्या वर्षभरात एक हजार २१७ वरून एक हजार १२७ पर्यंत कमी झाली आहे. माता मृत्यू दर कमी व्हावा यासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांतर्गत शासनाकडून प्रत्येक माता मृत्यूचं विश्लेषण केलं जात आहे.

****

टी- ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज शेवटच्या साखळी सामन्यात वेस्ट इंडिजनं अफगाणिस्तानचा १०४ धावांनी पराभव केला. सुपर 8 मधल्या सामन्यांना उद्यापासून सुरुवात होणार असून, भारताचा सामना २० तारखेला अफगाणिस्तानसोबत होणार आहे.

****

उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाणा आणि दिल्लीच्या काही भागांत पुढील दोन दिवस उष्णतेची लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. तर आगामी तीन दिवस पश्चिम बंगालचा काही भाग, आसाम, मेघालयात मुसळधार पावसाची शक्यता आहे.

राज्यात येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, विदर्भात बऱ्याच ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

****